# महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई चालक भरती सन २०२१
# पोलीस अधिक्षक, चंद्रपुर

**क्रमांक :- पोअचं/आस्था/एसबी-१/चा.पो.भरती-२०२१/जाहिरात/२०२२ चंद्रपुर दिनांक- ०५/११/२०२२**

महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा आणि दिनांक २७.०६ २०२२, दिनांक २३.०९.२०२२ व दिनांक २३.०९.२०२२ अन्वये सेवाप्रवेश नियमात केलेल्या सधारीत तरतुदीनुसार पोलीस दलातील पोलीस अधिक्षक, चंद्रपुर यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक यांची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी देखील आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे **दिनांक ०९.११.२०२२ ते ३०.११.२०२२ या कालावधीत** स्विकारण्यात येतील. ह्या बाबत सविस्तर माहिती policerecruitment2022.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहीतीकरिता प्रसिध्द करण्यात आली आहे.

- उमेदवारास पोलीस अधिक्षक, चंद्रपुर यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा policerecruitment2022.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एकाच घटकात एका पदासाठी एकापेक्षा जास्त आवेदन अर्ज सादर करु शकत नाही.
- उमेदवाराने चुकीची माहीती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.
- पोलीस शिपाई चालक या पदांसाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरीक चाचणी घेण्यात येईल. सदर शारीरीक चाचणीत किमान ५० टक्केगुण प्राप्त करणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गामधील जाहिरातीत नमुद केलेल्या रिक्त जागांच्या १.१० या प्रमाणात उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र ठरतील.
- लेखी चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना, हलके मोटार वाहन चालविण्याची चाचणी २५ गुणांची व जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी २५ गुणांची अशी एकुण ५० गुणांची कौशल्य चाचणी द्यावी लागेल. सदर दोन्ही चाचण्यांमध्ये एकत्रित किमान ४० टक्के गुण मिळवून उमेदवारास उत्तीर्ण व्हावे लागेल. कौशल्य चाचणीही केवळ एक अर्हता चाचणी असुन कौशल्य चाचणीत मिळालेले गुण, गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकुण गुणात समाविष्ट केले जाणार नाहीत. कौशल्य चाचणीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.
- पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवरील भरती प्रक्रिया वगळता इतर सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यांत येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरते वेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.
- शारिरीक चाचणी व लेखी परीक्षामध्ये प्राप्त केलेल्या एकुण गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्तेनुसार तात्पुरती निवडसूची तयार करण्यात येईल. तात्पुरत्या निवडसुची मध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसुचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसुचीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. **शारीरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रीकरण केल्यानंतर, ग़ह विभाग शासन निर्णय, दिनांक १०.१२.२०२० नुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल**

- पोलीस शिपाई चालक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारीरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्र/कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहीती, परिक्षा शुल्क,आवेदन अर्ज, सादर करण्यात बाबतची माहीती. अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सुचना policerecruitment2022.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहीरातीमध्ये उपलब्ध आहेत. **सदरहु जाहीरात उमेदवारानी काळजीपुर्वक वाचुन, समजुन घ्यावी. तसेच, सामाजीक, समांतर आरक्षण व अनाथांनकरीता उपलब्ध पदांच्या १ % आरक्षित जागा विचारात घेवुन रिक्त पदाबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारानी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावे**

- **भरती प्रक्रीयेदरम्यान शारीरिक चाचणी व लेखी चाचणी मध्ये निश्चीत केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहील्यास, त्यास भरती प्रक्रीयेतुन बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चीत केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येणार नाही.**
- उमेदवाराने संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे. त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेवुनच उमेदवाराने अर्ज सादर करावे. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात, परंतू खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाहीत.

- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या आधिन राहुन व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्ण याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहीती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

- शासनाने लागु केलेले खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी लागु केलेले आरक्षण हे या अनुषंगाने उद्‌भवणा-या न्यायालयीन प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधिन असेल.

**(रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी)**
पोलीस अधिक्षक, चंद्रपुर